**पोलीस उप आयुक्त परि-३ विरार यांचे कार्यालय,**
**मिरा-भाईदर-वसई-विरार पोलीस आयुक्तालय.**
कार्यालयाचा पत्ता- रिद्धी-सिद्धी अपार्टमेंट, वसई-नालासोपारालिंक रोड,
वसंतनगरी, नालासोपारा पुर्व ४०१२०८, फोननंबर- ०२५०-२४६०००४
Email ID- dcpzone3.mb-vv@mahapolice.gov.in

दि. १७/०४/२०२१.

# प्रेस नोट

**पोलीस उप आयुक्त, परिमंडळ -३, विरार कार्यालयामध्ये ई - भेट सुविधा कार्यन्वित केलेबाबत.**

कोव्हीड-१९ या विषानुमुळे आपल्यासमोर मोठे आव्हान उभे केले असुन पोलीस विभाग हा या महामारीच्या विरुध्द उपाययोजना राबविण्यामधील एक महत्वाची अग्रभागी संस्था आहे. कोव्हीड-१९ उपाययोजनांचा भाग म्हणुन शासनाने अनावश्यकपणे फिरणाऱ्या लोकांकरीता संचारबंदी लागु केलेली असुन सरकारी कार्यालयातील प्रत्यक्ष भेटीस मनाई केलेली आहे. अशा परिस्थितीमध्ये नागरिकांना, तसेच पोलीस अधिकारी व अंमलदारांच्या तक्रारी वरिष्ठ अधिकाऱ्यांपर्यंत पोहचविण्याकरीता एक माध्यम उपलब्ध करणे गरजेचे आहे. तसेच महाराष्ट्र शासनाने कोव्हीड-१९ या प्रादुर्भावाच्या अनुषंगाने **"ब्रेक द चेन"** अन्वये निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सुचनांमध्ये देखील अशाप्रकारचे माध्यम सुरु करण्याबाबत सुचना दिलेल्या आहेत. तसेच मा. पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर,वसई-विरार पोलीस आयुक्तालय यांचेकडील क्र पो.आ/मि.भा.व.वि/ई भेट १४८/२०२१, दि. १६/०४/२०२१ अन्वये देखील सुचना देण्यात आलेल्या आहेत.

त्याअनुषंगाने तक्रारदार यांनी पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-३, विरार यांचे समक्ष भेटी ऐवजी ऑनलाईन ई-भेट द्वारे संवाद साधावा. सदरचा ऑनलाईन संवाद सोमवार ते शुक्रवार या कामकाजाच्या दिवशी दुपारी ०३.०० ते ०५.०० या वेळेत ८९९९०५६०५ या क्रमांकावर व्हॉट्सॲप व्हिडीओ कॉल द्वारे संवाद साधावा. तसेच तक्रारी संबधीची कगदपत्रे सादर करावयाची असल्यास ती, वर नमुद केलेल्या व्हॉट्सॲप क्रमांकावर पाठवावीत.